दिनांक 05/09/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 83

विषय – विटा नगरपरिषद हद्दीतील विवेकानंदनगर येथील पंप हाऊस मध्ये सोलर नेट मिटरींग करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विदयुत अभियंता यांची दिनांक 05/09/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषद हद्दीतील विवेकानंदनगर येथील पंप हाउस मध्ये 5 HP क्षमतेचा पंप शहरातील घरांना पाणीपुरवठा करणेसाठी उपलब्ध आहे. सदरील विकासकामासाठी 10 kw क्षमतेचे सौरऊर्जा पॅनेल बसविणेसाठीची जागा नगरपरिषदेच्या मालकीच्या असलेल्या शाळा/ सभागृहाच्या टेरेसवर करणे सोईचे होईल. तसेच सदरील इमारत पंपहाऊसच्या नजीक आहे.

विटा नगरपरिषद हद्दीतील विवेकानंदनगर येथील पंप हाऊसला सोलर नेट मिटरींग केलेस वीज बिल कमी होण्यास मदत होईल. तरी विटा नगरपरिषद हद्दीतील विवेकानंदनगर येथील पंप हाउस मध्ये 10 kw क्षमतेचे सोलर नेट मिटरींग करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-

( डॉ. विक्रम बांदल )

प्रशासक

विटा नगरपरिषद विटा

दिनांक 05/09/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 84

विषय – विटा नगरपरिषद कार्यक्षेत्रात पाणी टंचाई काळात पाणी पुरवठा उपलब्ध करणेचे दृष्टीने वाझर तलाव हा उदभव धरून संप व पंप हाऊस (जॅकवेल) बांधणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी पा.पु.ज.नि.व.स्वच्छता अभियंता यांची दिनांक 05/09/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा शहर पाणी पुरवठा योजनेत घोगाव जॅकवेल ते आळसंद जलशुध्दीकरण केंद्र या दरम्यान टाकणेत आलेले उर्ध्व वाहिनी (Rising main) वारंवार नादुरूस्त होत असलेने पाणी पुरवठ्यावर गंभीर परिणाम होत होता त्यामुळे सदरची पाईप लाईन बदलून त्याचे जागी 20 कि.मी. DI K-9 450 mm उर्ध्व वाहिनी (Rising main) टाकणेत आलेली आहे. तसेच उर्वरित 14 कि.मी. पाणी पुरवठा पाईप लाईन ही PSC पाईप (Pretressed Concrete Pipe) व MS (Mild steel) या पासून बनविण्यात आलेल्या जुन्याच पाईप आहेत. त्यामधून मोठ्या प्रमाणावर वारंवार गळती होत असते. पुर्ण पाणी पुरवठा योजनेत तीन प्रकारच्या पाईप लाईन वापरण्यात आलेल्या असल्यामुळे लिकेज झाल्यावर जोडणी करताना अडचणी येत आहेत. त्यामुळे शहरात ब-याचवेळा एक दिवस आड पाणी पुरवठा करावा लागतो.

घोगाव जॅकवेल येथून आळसंद जलशुध्दीकरण केंद्र इथपर्यत 300 एच. पी. 3 पंपाच्या सहाय्याने पंपींग करणेत येते. सदर पंपींग मशनरीचे दरमहा अंदाजे रक्कम रू.32 लक्ष इतके वीज बील भरावे लागत आहे. त्याप्रमाणे आळसंद जलशुध्दीकरण केंद्र येथून शहराला 300 एच. पी. पंपाच्या सहाय्याने शुध्द पाणी पुरवठा करावा लागतो याकामी अंदाजे रक्कम रू.22 लक्ष मात्रचे वीज बील भरावे लागते त्यामुळे पाणी पुरवठ्यावरील खर्च मोठ्या प्रमाणात वाढत असून इतर विकास कामांवर त्याचा परिणाम होतो.

सबब पाणी पुरवठ्यासाठी करावा लागणारा मोठ्या प्रमाणावरील खर्चात बचत करणेसाठी विटा शहरास पुरेसा व अखंडित पाणी पुरवठा करणे व तसेच शहरातील सर्व भागात समान दाबाने पाणी पुरवठा करणे त्याचप्रमाणे भविष्यातील विटा शहराची वाढती लोकसंख्या विचारात घेऊन वाझर तलावातून आपत्तीच्या काळात जसे (कृष्णा नदी महापूर, पाईप लाईन लिकेज) इ. वेळी अधिकचे पाणी खात्रीने उपलब्ध होणेसाठी वाझर येथे संप व पंप हाऊस (जॅकवेल) बांधणे आवश्यक आहे.

तरी विटा नगरपरिषद कार्यक्षेत्रात पाणी टंचाई काळात पाणी पुरवठा उपलब्ध करणेचे दृष्टीने वाझर तलाव हा उदभव धरून संप व पंप हाऊस (जॅकवेल) बांधणेस तसेच वाझर तलाव येथे विटा नगरपरिषद पाणी पुरवठा योजनेकरीता पाटबंधारे विभागाकडून आवश्यक आरक्षण प्रस्तावित करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ. विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा